नियमित दिवाणी दावा क्रमांक २५/१७
सी.एन.आर. नंबर **MHRT**060001792017

# निशाणी ८३ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा अवसान आदेश (suit abates) रद्द होणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. मुदती कायदे अनुसार दाव्यामधील एखाद्या वादी किंवा प्रतिवादी मयत झाले तारेखेपासून ९० दिवसांचे आतमध्ये त्यांचे वारस अभिलेखावरती घेणे अवश्यक आहे, तसे न झाल्यास, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ३ (२) अनुसार जर मुदतीत मयत वादीचे वारस अभिलेखावरती घेतले नाही, तर त्या वादीच्या विरुध्द प्रस्तुतचा दावा अवसान होईल.

३. वादी यांनी अर्जमध्ये कथन केले आहे की, दि. ०१/०६/२०२१ रोजी वादी मयत झाले आहेत परंतु वादीचे पत्नीला मानसिक धक्का बसला होता व वादींचे वारस मुलगे हे नोकरी निमीत्त परगावी असल्याने त्यांचे मुखत्यारपत्र अँबेसी मार्फत पाठविणेकरीता वेळ लागल्याने वारसांची मुदतीत तजवीज करता आली नाही. त्यामुळे वादी यांचे वारस अभिलेखावरती घेण्यासाठी विलंब झालेला आहे. त्यामुळे दावा अवसान झालेचा आदेश बाजूसस होणेची विनंती केली आहे. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्जावर जास्तीत जास्त कॉस्ट करुन मंजूर करणेची विनंती केली आहे. दोन्ही

बाजूच्या वकिलांनी त्यांचे कथनास अनुसरुन युक्तीवाद केला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ९(४) अनुसार दावा अवसान झालेचा आदेश बाजूस होवून मिळणेकरीता वादी किंवा प्रतिवादी यांनी मुदतीचे कायदा अनुसार दावा अवसान झालेचे तारखेपासून ६० दिवसाचे आतमध्ये अर्ज दाखल करणे क्रम प्राप्त आहे. तसे न झाल्यास मुदती कायद्याचे कलम ५ अनुसार विलंबमाफीचा अर्ज देखील देता येवू शकतो. प्रस्तुत कामी वादी यांनी या अर्जासोबत विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे.

५. विलंब माफीच्या अर्जातील कारण योग्य व सबळ असल्याने तो मंजूर करणेत आला आहे. तसेच वादीचे वारस यांनी वादीचे वारस अभिलेखावरती घेणेसाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जातील कथनांचा विचार करता, दावा अवसान झालेचा आदेश बाजूस होवून वादीचे वारसांचे विरुध्द दावा चालविणेचा अधिकार वादी यांना आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास होवू घातलेले प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तुत अर्जातील कारण व नैसर्गिक न्याय तत्वांचा विचार करता, वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्याय उचित होणार आहे. प्रतिवादी क्र. २,३,५ यांचे विरुध्द एकतर्फा आदेश झाला आहे व प्रतिवादी क्र. ४,६,८ हे वादीस सामिल असल्याने प्रतिवादी क्र. १ व ७ यांना नुकसान भरपाई रक्कम देणेचे आदेश करणे योग्य राहिल. सबब, खालील आदेश करीत आहे.

## – आदेश –

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व ७ यांना रक्कम रु. २००/– प्रत्येकी कॉस्ट म्हणून देणेचे अटीवर मंजूर करणेत येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो. )

सही/–

**ठिकाण – दापोली.** **(श्री.एम.ए.शिंदे)**

**दि. २७/०९/२०२३.** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, दापोली**

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of the P. D. F. file order are same, word to word as per original Order.

| | |
|---|---|
| Name of Clerk : | S. B. Palshetkar |
| Court Name : | Shri. M.A.Shinde<br>Jt. Civil Judge (J.D.),Dapoli. |
| Date of decision : | 27/09/2023 |
| Order signed by Presiding Officer on : | 27/09/2023 |
| Judgment uploaded on : | 29/09/2023 |